मच्छिमार साधनांसाठी सागरी जिल्हयांत दिल्या
जाणाऱ्या अनुदानांत वाढ.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः-मत्स्यम-१०८१/६३१५/१२/पदुम**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांकः- १६ डिसेंबर,१९८१.**

**वाचाः-** १. शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग,
क्रमांक मत्स्यम-१५६७/२७८१९/ग, दिनांक १६.७.१९७०
२. मत्स्यव्यवसाय संचालकाचे क्रमांक-मत्स्यम १९८१-८२
७-मवि,दिनांक ८ मे १९८१ चे पत्र.

निर्णयः- शासन निर्णय क्रमांक-मत्स्यम १५६७/२७८१९/ग,दिनांक १ एप्रिल १९७० अन्वये मच्छिमारांनी खरेदी केलेल्या मच्छिमारी साधनांवर अनुदान देण्याच्या योजनेखाली खालील प्रमाणे अनुदान देण्यात येत होतेः-

१) नायलॉन सत - सूताच्या किंमतीच्या १५ टक्के किंवा प्रति किलोस रु.६/- हयापैकी जे कमी असेल ते.

२) फिलामेंट किंवा — किंमतीच्या १५ टक्के किंवा प्रति कीलोस
मोनोफिलामेंट रु.४/- हयापैकी जे कमी असेल ते.
सिथेंटीक टवॉईन.

वरील अनुदानाच्या मर्यादेत सुधारणा करुन अनुदानाचा सध्याचा दर १५ टक्के कायम ठेवून त्यातील अनुक्रमे रु.६/- व रु.४/- हया मर्यादा काढून टाकण्यात येत आहेत व आता हे अनुदान १५ टक्के मर्यादा विरहीत देण्यास शासनास मंजूरी देत आहे. मात्र नायलॉन सूत खरेदीची कमाल मर्यादा ३ टनांवरील नौकांसाठी दर नौकेला प्रति वर्षी १०० किलो व ३ टनापेक्षा लहान नौकेस दर नौकेला प्रती वर्षी ५० किलो असावी.

२. सदर योजनेवरील वाढीव खर्च ७१२-मत्स्यव्यवसायासाठी कर्जे-इतर कर्जे राज्य योजनांतर्गत योजना इतर बाबींसाठी मच्छिमारांना कर्जे हया अर्थशिर्षाखाली नोंदवावा व ठाणे, रायगड, रत्नागिरी (सिंधुदुर्ग सहीत) व मुंबई हया जिल्हयासाठी केलेल्या तरतूदीतून भागवावा.

३. हे आदेश वित्त विभागाच्या अनुमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१००३/इएक्सपी-१४,दिनांक २४.११.१९८१ अन्वये निर्गमित होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
(रा.अ.गोखले),
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि व सहकार विभाग.

प्रति,
मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई
मत्स्यव्यवसाय उपसंचालक, कोकण विभाग, मुंबई
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई, रायगड, ठाणे (पालघर)
महालेखापाल, महाराष्ट्र-१- मुंबई
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई/वित्त विभाग